# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य ,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स – 22692102.

E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in

परिपत्रक

क्रमांक : १०/एनजीपी/ मुदतठेवी/२०१९/ १३५०

दिनांक : 11 DEC 2019

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

अमरावती/ औरंगाबाद/ मुंबई/ नागपूर/ नाशिक/ पुणे.

विषय : तंत्रशिक्षण, संचालनलयाच्या अखत्यारीत असलेल्या विविध अभ्यासक्रम सुरु करण्याच्या अनुषंगाने संचालक, तंत्रशिक्षण व संस्था यांच्या संयुक्त खात्यात ठेवण्यात आलेल्या मुदतठेवींबाबत........

उपरोक्त विषयाबाबत नमूद करण्यात येते की, तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीत असलेल्या विविध पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था सुरु करणे/ अभ्यासक्रम सुरु करणे इ. च्या अनुषंगाने संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य व संस्था यांच्या संयुक्त खात्यात संस्थेमार्फत नियमाप्रमाणे विहित रकमेच्या मुदतठेवी ठेवण्यात येतात. सदर मुदतठेवींची मुदतपुर्ण झाल्यानंतर मुदतठेवींचे नुतनीकरण करुन जमा व्याज संस्थेच्या खाती जमा करणे अथवा संबंधित संस्था/ अभ्यासक्रम बंद झाल्यानंतर सदर मुदतठेवी बंद करुन मुदतठेवीची मुल रक्कम तसेच जमा व्याज संस्थेच्या खाती जमा करणे याकरीता संचालनालयाची मान्यता घेण्याबाबतचे प्रस्ताव संबंधित संस्थेमार्फत थेट या संचालनालयास प्राप्त होतात. त्यामुळे सदर संस्थांच्या तक्रारी/ न्यायालयीन प्रकरणे इ. बाबत सद्यस्थिती संचालनालयास प्राप्त होत नाही.

तरी, सदर परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, आपल्या विभागातील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीत असलेल्या विविध पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांना, मुदतठेवींचे नुतनीकरण करुन जमा व्याज संस्थेच्या खाती जमा करणे अथवा संबंधित संस्था/ अभ्यासक्रम बंद झाल्यानंतर सदर मुदतठेवी बंद करुन मुदतठेवीची मुळ रक्कम तसेच जमा व्याज संस्थेच्या खाती जमा करणे याबाबतचा प्रस्ताव थेट संचालनालयास सादर न करता संबंधित तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयामार्फत सादर करण्याबाबत कळविण्यात यावे. तसेच उपरोक्त प्रस्ताव संबंधित तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयामार्फत सादर न केल्यास संचालनालय स्तरावर त्याची दखल घेतली जाणार नाही, तसेच सदर प्रस्ताव सादर करतांना सदर मुदतठेवींच्या प्रतींवर बँकेच्या शाखेचे नाव व पुर्णपत्ता पिनकोडसह, संस्थेचा डीटीई कोड, अभ्यासक्रमाचा स्तर, अभ्यासक्रमाचे नाव नमूद करुन संस्थेच्या शिक्क्यासह सादर करावयात, असेही संबंधित संस्थांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे.

सदर प्रकरणी संस्थेमार्फत आपल्या कार्यालयास प्राप्त होणाऱ्या, मुदतठेवींचे नुतनीकरण करुन जमा व्याज संस्थेच्या खाती जमा करणे अथवा संबंधित संस्था/ अभ्यासक्रम बंद झाल्यानंतर सदर मुदतठेवी बंद करुन मुदतठेवीची मुळ रक्कम तसेच जमा व्याज संस्थेच्या खाती जमा करणे याबाबतच्या प्रस्तावांच्या अनुषंगाने सदर

सहसंचालक तंत्रशिक्षण
विभागीय कार्यालय, नागपूर
728-6
16 DEC 2019

संस्थांच्या तक्रारी/ न्यायालयीन प्रकरणे इ. बाबत सद्यस्थितीसह याबाबत आपले स्वंयस्पष्ट अभिप्राय नमूद करुन आवश्यक कागदपत्रांसह तपशिलवार व परिपुर्ण प्रस्ताव या संचालनालयास सादर करण्यात यावा. तसेच याबाबत संस्थांनी केलेल्या कार्यवाहीची पडताळणी करुन केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल संचालनालयास सादर करावा.

(प्रमोद नाईक)
सहसंचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई.

---

पृष्ठांकन क्रं./तंशिस/विकाना/शैवि /2019/3770
दिनांक:- 16 DEC 2019

प्रति,
प्राचार्य
सर्व पदवी,पदव्यत्तर पदवि व पदवीका संस्था
नागपूर विभाग, नागपूर

नागपूर विभागातील सर्व पदवी,पदव्यत्तर पदवि व पदवीका संस्थानी उपरोक्त् परिपत्रात नमूद केल्या प्रमाणे कार्यवाही करावी.

(डॉ.राम निबुदे)
**प्र.सहसंचालक**
**तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नागपूर**